# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. : २८१९ २८२८.


**।। सामान्य प्रशासन विभाग ।।**

**जा.क्र.मनपा/सा.प्र./ १३६ /२०२३ - २४** **दि. ०३ / ८ /२०२३**

## // परिपत्रक //

**विषय:-** सार्वजनिक प्राधिकरणाने स्वत:हून किंवा सकारात्मक तत्वावर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ बाबतच्या कलम ४ अन्वये माहिती प्रकट करण्याबाबत.

मिरा भाईदर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर माहिती अधिकार अधिनियम 2005 चे अंतर्गत कलन 4 मध्ये नमुद बाबींची माहिती प्रसिध्द करणे बंधनकारक आहे. याबाबत सामान्य प्रशासन विभागामार्फत वेळोवेळी कार्यालय परिपत्रक प्रस्तुत करुन सुचित करण्यात आले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम यांच्या कलम 4 (1) (ख) अन्वये निर्धारित केलेली माहिती प्रकट करणे अपेक्षित आहे. कलम 4 (2) व कलम 4 (3) मध्ये या माहितीचा प्रसार करण्याची पध्दत विहित केली आहे. केंद्र शासनाने त्यांच्या परिपत्रक क्र.01/01/2013 दि.09/07/2015 व राज्य शासनाने त्यांच्या परिपत्रक क्र. 189/15/का-सहा, दि. 25/08/2015 अन्वये माहिती अधिकारांतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्जाबाबतची उत्तरे तसेच प्रथम अपिलाबाबतचे निर्णय इत्यादी माहिती प्रसिध्द न करणे ही गंभीर स्वरुपाची बाब असुन त्या संदर्भात नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

सदर परिपत्रकान्वये सर्व जनमाहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, केंद्रशासनाचा माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, यांच्या वरील शासन परिपत्रकानुसार राज्य माहिती आयोगाने माहिती अधिकार अधिनियमच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनास केलेल्या शिफारशींचे अनुपालन करण्यात यावे तसेच माहिती अधिकारात आलेल्या अर्जाच्या अनुषंगाने तसेच आलेल्या अपिलांच्या अनुषंगाने अर्ज व जी उत्तरे दिलेली आहेत ती मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी व शासनाने वेळोवेळी केलेल्या सुचनांची अंमलबजावणी करण्यात यावी.

**(मारुती गायकवाड)**
**उपायुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**